# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // बांधकाम विभाग //

## // गोषवारा // दि. २१/८/२०२३

**प्रकरण क्रमांक.** ०८७ - मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चेणे सर्व्हे क्र.2,90,91,148 हि विकास योजना रस्त्याखालील मालकी जमीन भुसंपादन करण्याबाबत..

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील मंजुर विकास योजना रस्त्यामध्ये बाधित जागा विकास रस्त्याकरीता भुसंपादन करावयाच्या आहे. सदर बाधित जागा जागामालक विकास हक्क प्रमाणपत्राच्या स्वरुपात (TDR) मार्फत महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेस तयार नसल्याने सदर जागा जिल्हाधिकारी यांच्यामार्फत **भुमी संपादन पुर्नवसन व पुर्नवसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013** (नविन भुसंपादन अधिनियम 2013) चा वापर करुन महानगरपालिकेस रस्ता विकास करण्यास उपलब्ध करुन मिळणार आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब दि.०१/०८/२०१६ मध्ये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (दुसरी सुधारणा) नियम, २०१६ प्रसिद करण्यात आली असुन भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ मध्ये सुधारणा करुन नियम १४ मधील उपनियम १ मध्ये "महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) याच्या तरतुदीअन्वये विकास योजनेतील राखीव क्षेत्राच्या संपादनाबाबत तसेच पन्नास टक्के किंवा त्याहुन अधिक अपूर्ण सिंचन प्रकल्पांच्याबाबतीत, भूमिसंपादनाच्या खर्चासंबंधिची तीस टक्के इतकी बीनव्याजी रक्कम अधिनियमाच्या कलम १९ अन्वये घोषणापत्र प्रसिध्द करणेपूर्वी जमा करण्यात येईल आणि भूमिसंपादनाच्या खर्चासंबंधिची उर्वरित सत्तर टक्के रक्कम निवाडा घोषित करणेपुर्वी जमा करणेत येईल. आणि जर अशी रक्कम जमा केलेली नसेल तर अधिनियमाच्या अनुक्रमे कलम १९ व २३ अन्वये कोणतीही घोषणा करता येणार नाही किंवा निवाडा देता येणार नाही" असे परंतुक दाखल करण्यात आलेले आहे.

सदर भुसंपादन करण्यात येणाऱ्या रस्त्यांची यादी खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | सर्व्हे क्रमांक | अंदाजित नुकसान भरपाई रक्कम | 30% रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | मौजे.चेणे येथील नियोजीत 18.00 मी. रुंदी रस्ता | मौजे.चेणे येथील सर्व्हे क्र.2, 90,91 व 148 (6739.00 चौ.मी.) | रु.9,21,49,086/- | रु.2,76,44,726/- |

तरी वरीलप्रमाणे सदरची 30% रक्कम ही भुमी संपादन पुर्नवसन व पुर्नवसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 (नविन भुसंपादन अधिनियम 2013) चे कलम 19 खालील अधिसुचना प्रसिध्द करणेपुर्वी बिनव्याजी तत्वावर उप विभागीय अधिकारी, उप

विभाग, ठाणे यांच्या कार्यालयात जमा करावयाची असून 30% रक्कम जमा केल्याशिवाय विषयांकित प्रकरणी पुढील कार्यवाही करता येणार नाही असे कळविलेले आहे. त्याचप्रमाणे नुकसान भरपाई उर्वरित 70% रक्कम हि निवाडा घोषित करणेपुर्वी जमा करावयाची आहे. असे संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

वरील प्रमाणे रु.9,21,49,086/- रक्कम भुसंपादनासाठी अदा करणेस खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-09/VP/2023-24/DK/MG-6

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 29/06/23 वेळ दु. 3-25 वा.
गोषवारा नोंद क्र. 963 सन 2023/24
लिपीक 29/6/23
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव दिनांक ०२/ ०८ / 2023 रोजी ११.३० वाजता.**

**विषय क्र. (५८७) :-** मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील चेणे सर्व्हे क्र.2,90,91,148 हि विकास योजना रस्त्याखालील मालकी जमीन भुसंपादन करण्याबाबत..

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील मंजुर विकास योजना रस्त्यामध्ये बाधित जागा विकास रस्त्याकरीता भुसंपादन करावयाच्या आहे. सदर बाधित जागा जागामालक विकास हक्क प्रमाणपत्राच्या स्वरुपात (TDR) मार्फत महानगरपालिकेस हस्तांतरील करणेस तयार नसल्याने सदर जागा जिल्हाधिकारी यांच्यामार्फत **भुमी संपादन पुर्नवसन व पुर्नवसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम** 2013 (नविन भुसंपादन अधिनियम 2013) चा वापर करुन महानगरपालिकेस रस्ता विकास करण्यास उपलब्ध करुन मिळणार आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब दि.०१/०८/२०१६ मध्ये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (दुसरी सुधारणा) नियम, २०१६ प्रसिद करण्यात आली असुन भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ मध्ये सुधारणा करुन नियम १४ मधील उपनियम १ मध्ये "महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) याच्या तरतुदीअन्वये विकास योजनेतील राखीव क्षेत्राच्या संपादनाबाबत तसेच पन्नास टक्के किंवा त्याहुन अधिक अपूर्ण सिंचन प्रकल्पांच्याबाबतीत, भूमिसंपादनाच्या खर्चासंबंधिची तीस टक्के इतकी बीनव्याजी रक्कम अधिनियमाच्या कलम १९ अन्वये घोषणापत्र प्रसिध्द करणेपूर्वी जमा करण्यात येईल आणि भूमिसंपादनाच्या खर्चासंबंधिची उर्वरित सत्तर टक्के रक्कम निवाडा घोषित करणेपुर्वी जमा करणेत येईल. आणि जर अशी रक्कम जमा केलेली नसेल तर अधिनियमाच्या अनुक्रमे कलम १९ व २३ अन्वये कोणतीही घोषणा करता येणार नाही किंवा निवाडा देता येणार नाही" असे परंतुक दाखल करण्यात आलेले आहे.

सदर भुसंपादन करण्यात येणाऱ्या रस्त्यांची यादी खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | सर्व्हे क्रमांक | अंदाजित नुकसान भरपाई रक्कम | 30% रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | मौजे.चेणे येथील नियोजीत 18.00 मी. रुंदी रस्ता | मौजे.चेणे येथील सर्व्हे क्र.2, 90,91 व 148 (6739.00 चौ.मी.) | रु.9,21,49,086/- | रु.2,76,44,726/- |

तरी वरीलप्रमाणे सदरची 30% रक्कम ही भुमी संपादन पुर्नवसन व पुर्नवसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 (नविन भुसंपादन अधिनियम 2013) चे कलम 19 खालील अधिसुचना प्रसिध्द करणेपुर्वी बिनव्याजी तत्वावर उप विभागीय अधिकारी, उप विभाग, ठाणे यांच्या कार्यालयात जमा करावयाची असून 30% रक्कम

जमा केल्याशिवाय विषयांकित प्रकरणी पुढील कार्यवाही करता येणार नाही असे कळविलेले आहे. त्याचप्रमाणे नुकसान भरपाई उर्वरित 70% रक्कम हि निवाडा घोषित करणेपुर्वी जमा करावयाची आहे. असे संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

वरील प्रमाणे रु.9,21,49,086/- रक्कम भुसंपादनासाठी अदा करणेस खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

## **प्रशासकीय ठराव क्र. १८७ दिनांक २/८/2023**

वरील प्रमाणे प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2) / नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी श्री. दिलीप ढोले, मिरा-भाईंदर महानगरपालिका, मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार प्रस्तावित कामासाठी रु.9,21,49,086/- रक्कम भुसंपादनासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 8 मधील 76, 77 व 78 नुसार प्रस्तावास व खर्चास तसेच मागणीनुसार टप्प्याटप्प्याने जमा करण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबत पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पध्दीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

प्रशासकीय सभा दि. ०२ /०८/२०२३

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. :-१८८ मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रात नव्याने विकसीत उद्याने, मैदाने व दुभाजक करीता लालमाती व शेणखत पुरवठा करणे तसेच उद्यानातील खेळण्यांखाली टाकण्याकरीता सफेदरेती पुरवठा करणे. (कालावधी १ वर्ष) ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेबाबत. (वार्षिक निविदा)**

**(Tender ID. N.I.C. २०२३_MBMC_९१६४९४_१)**

मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रात नव्याने विकसीत उद्याने, मैदाने व दुभाजक करीता लालमाती व शेणखत पुरवठा करणे तसेच रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांना माती भराव करणे उद्यानातील खेळण्यांखाली टाकण्याकरीता सफेदरेती पुरवठा करणेकामी दि.१५/०६/२०२३ रोजीची जाहिर सुचनेनुसार ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने व दै. लोकदृष्टी व सा. जनकल्यान सेवा या वृत्तपत्रात प्रसिध्दी देवुन दि.१६/०६/२०२३ ते दि.२३/०६/२०२३ या कालावधीत जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

सदर कालावधीमध्ये प्राप्त ०४ निविदाधारकांची Technical Bid दि.२७/०६/२०२३ रोजी उघडण्यात आले असता प्राप्त ०४ निविदाधारकांच्या कागदपत्रांची पडताळणी मा. निविदा समिती समोर करुन पात्र ०२ निविदाधारकांची Financial Bid उघडण्यास दि.१९/०७/२०२३ रोजी मा. निविदा समितीने शिफारस करुन दि.२४/०७/२०२३ रोजी मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पात्र ०२ निविदांची Financial Bid दि.२६/०७/२०२३ रोजी उघडली असता मे. अस्थेस्टीक लॅण्डस्केपींग (L१) यांची कमी दराची L१ निविदा प्राप्त झालेली असुन सदर दराची वाटाघाटी दि.२७/०७/२०२३ रोजी मा. निविदा समिती समोर केलेली असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | तपशिल | परीमाण | DSR Rate २०२२-२३ | Rate (Including all taxes) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मे. हिरावती इंटरप्रायजेस | मे. ॲस्थेस्टिक लॅण्डस्केपींग | मे. ॲस्थेस्टिक लॅण्डस्केपींग यांचे वाटाघाटी अंतीचे दर |
| 1 | लालमाती | Per Cubic Meter ($m^3$) | रु.१५००/- | रु.१,२९९/- | रु.१,२७५/- | **रु.१,२७५/-** |
| 2 | शेणखत | Per Cubic Meter ($m^3$) | रु.१५५०/- | रु.९००/- | रु.८९१/- | **रु.८९१/-** |
| 3 | सफेदरेती | Per Cubic Meter ($m^3$) | | रु.२,८००/- | रु.२,७७५/- | **रु.२,५००/-** |

वरील नमुद केलेल्या कामा करीता मे. ॲस्थेस्टीक लॅण्डस्केपींग यांनी निविदेत भरलेल्या दरमध्ये वाटाघाटी केलेली असुन सदर दर हे वाजवी असून मे. ॲस्थेस्टिक लॅण्डस्केपींग (L१) यांची वाटाघाटीअंतीची निविदा स्विकारणेकामी दि.२७/०७/२०२३ रोजी मा. निविदा समितीने शिफारस केलेली असुन मा.प्रशासक यांच्या मान्यते करीता गोषवारा सादर करण्यास मा.आयुक्त सो. यांनी दि.३१/०७/२०२३ रोजी मंजुरी दिलेली आहे. सदरकामी अंदाजे रु. ५०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रात नव्याने विकसीत उद्याने, मैदाने व दुभाजक करीता लालमाती व शेणखत पुरवठा करणे तसेच उद्यानातील खेळण्यांखाली टाकण्याकरीता सफेदरेती पुरवठा करणे. (कालावधी १ वर्ष) मे.ॲस्थेस्टिक लॅण्डस्केपींग यांची कमी दराची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास मा.प्रशासक यांची मान्यता मिळणेस शिफारस असे.

(कल्पिता पिंपळे)
उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

प्रशासकीय ठराव दि.०२/०८/२०२३ रोजी स. ११.३० [?] वाजता.

प्रकरण क्र. १८८ [?] :- मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रात नव्याने विकसीत उद्याने, मैदाने व दुभाजक करीता लालमाती व शेणखत पुरवठा करणे तसेच उद्यानातील खेळण्यांखाली टाकण्याकरीता सफेदरेती पुरवठा करणे. (कालावधी १ वर्ष) ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेबाबत. (वार्षिक निविदा)
**(Tender ID. N.I.C. २०२३_MBMC_९१६४९४_१)**

### कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रात नव्याने विकसीत उद्याने, मैदाने व दुभाजक करीता लालमाती व शेणखत पुरवठा करणे तसेच रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांना माती भराव करणे उद्यानातील खेळण्यांखाली टाकण्याकरीता सफेदरेती पुरवठा करणेकामी दि.१५/०६/२०२३ रोजीची जाहिर सुचनेनुसार ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने व दै. लोकदृष्टी व सा. जनकल्यान सेवा या वृत्तपत्रात प्रसिध्दी देवुन दि.१६/०६/२०२३ ते दि.२३/०६/२०२३ या कालावधीत जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

सदर कालावधीमध्ये प्राप्त ०४ निविदाधारकांची Technical Bid दि.२७/०६/२०२३ रोजी उघडण्यात आले असता प्राप्त ०४ निविदाधारकांच्या कागदपत्रांची पडताळणी मा. निविदा समिती समोर करुन पात्र ०२ निविदाधारकांची Financial Bid उघडण्यास दि.१९/०७/२०२३ रोजी मा. निविदा समितीने शिफारस करुन दि.२४/०७/२०२३ रोजी मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पात्र ०२ निविदांची Financial Bid दि.२६/०७/२०२३ रोजी उघडली असता मे. अस्थेस्टीक लॅण्डस्केपींग (L१) यांची कमी दराची L१ निविदा प्राप्त झालेली असुन सदर दराची वाटाघाटी दि.२७/०७/२०२३ रोजी मा. निविदा समिती समोर केलेली असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | तपशिल | परीमाण | DSR Rate २०२२-२३ | Rate (Including all taxes) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मे. हिरावती इंटरप्रायजेस | मे. ॲस्थेस्टिक लॅण्डस्केपींग | मे. ॲस्थेस्टिक लॅण्डस्केपींग यांचे वाटाघाटी अंतीचे दर |
| 1 | लालमाती | Per Cubic Meter ($m^3$) | रु.१५००/- | रु.१,२९९/- | रु.१,२७५/- | **रु.१,२७५/-** |
| 2 | शेणखत | Per Cubic Meter ($m^3$) | रु.१५५०/- | रु.९००/- | रु.८९१/- | **रु.८९१/-** |
| 3 | सफेदरेती | Per Cubic Meter ($m^3$) | | रु.२,८००/- | रु.२,७७५/- | **रु.२,५००/-** |

वरील नमुद केलेल्या कामा करीता मे. ॲस्थेस्टिक लॅण्डस्केपींग यांनी निविदेत भरलेल्या दरमध्ये वाटाघाटी केलेली असुन सदर दर हे वाजवी असून मे. ॲस्थेस्टिक लॅण्डस्केपींग (L१) यांची वाटाघाटीअंतीची निविदा स्विकारणेकामी दि.२७/०७/२०२३ रोजी मा. निविदा समितीने शिफारस केलेली असुन मा.प्रशासक यांच्या मान्यते करीता गोषवारा सादर करण्यास मा.आयुक्त सो. यांनी दि.३१/०७/२०२३ रोजी मंजुरी दिलेली आहे. सदरकामी अंदाजे रु. ५०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सबब, मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रात नव्याने विकसीत उद्याने, मैदाने व दुभाजक करीता लालमाती व शेणखत पुरवठा करणे तसेच उद्यानातील खेळण्यांखाली टाकण्याकरीता सफेदरेती पुरवठा करणे. (कालावधी १ वर्ष) मे.ॲस्थेस्टिक लॅण्डस्केपींग यांची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास मा.प्रशासक यांची मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५८८ दि. ०२/०८/२०२३**

मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रात नव्याने विकसीत उद्याने, मैदाने व दुभाजक करीता लालमाती व शेणखत पुरवठा करणे तसेच उद्यानातील खेळण्यांखाली टाकण्याकरीता सफेदरेती पुरवठा करणे. (कालावधी १ वर्ष) मे. ॲस्थेस्टिक लॅण्डस्केपींग यांची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपलिका क्षेत्रात नव्याने विकसीत उद्याने, मैदाने व दुभाजक करीता लालमाती व शेणखत पुरवठा करणे तसेच उद्यानातील खेळण्यांखाली टाकण्याकरीता सफेदरेती पुरवठा करणेकामी (कालावधी १ वर्ष) मे. ॲस्थेस्टिक लॅण्डस्केपींग यांची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास त्याकामी येणाऱ्या अंदाजित रु.५०.०० लाख खर्चास प्रशासकीय मान्यता ठरावाद्वारे देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार उद्यान विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दि. ०२/ ०८ /२०२३

### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** (७८९) अग्निशमन विभागाकरिता नासा फायर एक्स्टींग्युशर्स अग्निशामकें यंत्रणा खरेदी करणेबाबत.

**संदर्भ** :- १) मा. आयुक्त सो. यांची या विभागाकडील मिभा/मनपा/अग्नि/१७३/२०२३-२४ दि. ०८/०५/२०२३ रोजीच्या अहवालास मंजूरी.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळवितो की, संदर्भ क्र.१ अन्वये **Nasa Water Based 45 ltr Fire Extinguisher For High Tempreature Class A Fire (T-450-W-ACH)** नासा फायर एक्स्टींग्युशर्स अग्निशामके यंत्रणा खरेदी करणेबाबत मिभा/मनपा/अग्नि/१७३/२०२३-२४ दि.०८/०५/२०२३ रोजीच्या अहवालास मा. आयुक्त सो. यांची मंजूरी प्राप्त केल्याच्या अनुषंगाने आपणास कळवू इच्छितो की, वेलॉसिटी वेंचर या कंपनीचे **Nasa Water Based 45 ltr Fire Extinguisher For High Tempreature Class A Fire (T-450-W-ACH)** फायर एक्स्टिंग्युशर हे सर्व प्रकारच्या (अ, ब, क) आगी विझविण्यासाठी उपयुक्त असुन हा एक्स्टींग्युशर्स उपयुक्तते नुसार कमी जास्त प्रमाणात वापरला जावु शकतो. तसेच सदरची अग्निशमन यंत्रणा ही **BIS** स्वीकृत असुन त्यास कंपनीने १० वर्षाकरीता मोफत मेन्टेंन्स हमी (वॉरंटी) दिली आहे. तरी सदर उपकरणाची सद्यःस्थितीत अग्निशमन विभागात वापरत असलेल्या उपकरणा सोबत तुलना केली असता, काही ठळक बाबी निदर्शनास आल्या आहेत त्या खालीलप्रमाणे

| अ. क्र | तपशील | नासा फायर एक्स्टिंग्युशर | इतर फायर एक्स्टिंग्युशर |
|---|---|---|---|
| १) | बनावट | स्टेनलेस स्टील (SS ३०४) | माइल्ड स्टील |
| २) | सेफ्टी | लिक प्रुफ वॉल्व टेक्नोलॉजी | नॉन लिक प्रुफ वॉल्व |
| ३) | वापर उपयुक्तता | शेवटच्या थेंबापर्यंत (वारंवार वापरता येते) | वारंवार वापर शक्य नाही. (एकदा वापर केल्यानंतर दुसऱ्यांदा वापर करणे शक्य नाही) |
| ४) | वॉरंटी | १० वर्षापर्यंत | १ ते ३ वर्षापर्यंत |
| ५) | मान्यता | **BIS** मान्यता | - |
| ६) | बायबॅक | सुविधा उपलब्ध | सुविधा उपलब्ध नाही |
| ७) | कोणत्या आगीवर उपयुक्त | सर्व प्रकारच्या तसेच क्लास अ वर्गाच्या आगींवर प्रभावीपणे उपयुक्त | विविध आगींवर विशिष्ट एक्स्टिंग्युशर आवश्यक |

वरील ठळक वैशिष्टये लक्षात घेता नासा एक्स्टिंग्युशर हे सर्व प्रकारच्या आगींवर मुख्यतः पेट्रोलियम आगीवर वापरता येईल. तसेच सदर उपकरणाची वॉरंटी कालावधी व आगीवर गरजेनुसार वापर करण्याची मुभा असल्याने एकापेक्षा अधिक वेळा वापर करता येईल. त्यामुळे अनाठायी रिफीलिंग चा खर्च टाळता येईल.

मे. वेलॉसिटी वेचर यांनी **Nasa Water Based 45 ltr Fire Extinguisher For High Tempreature Class A Fire (T-450-W-ACH)** (ट्रॉली माउंटेड) ४५ लिटर क्षमतेचे अशा फायर एक्स्टिंग्युशर्स करिता १८% जी. एस. टी. सह सादर केलेल्या बाजारातील किमतीचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | तपशील | दर प्रति नग (रु.) | जी. एस. टी. १८% (रु.) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ४५ लिटर क्षमतेचे | ८,३५,२५० | १,००,२३० | ९,३५,४८० |

सदर उपकरणांची बाजारात अंदाजे किंमत वर नमुद केल्याप्रमाणे आहे. अग्निशमन विभागाकरिता सदरची ४५ लिटर क्षमतेचे १० नग खरेदी करिता प्रति नग रु. ९,३५,४८०/- या दराने असे अंदाजित खर्च रु.९३,५४,८००/- इतका अपेक्षित आहे.

सन २०२३-२४ यां चालु आर्थिक वर्षात "साधन सामुग्री व भांडारे याची खरेदी" या लेखाशिर्षाअंतर्गत रू. ५५०.००/- लाख इतकी तरतूद आहे.

तरी अग्निशमन विभागाकरीता **Nasa Water Based 45 ltr Fire Extinguisher For High Tempreature Class A Fire (T-450-W-ACH)** (ट्रॉली माउंटेड) ४५ लिटर क्षमतेचे १० नग खरेदी करणेकरीता येणाऱ्या अंदाजे खर्चास रुपये रु. ९३,५४,८००/- या रकमेस व सदर कामी ई निविदा www.mahatender.gov.in या शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेस व येणाऱ्या खर्चास आपणांची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस व सदरचा प्रस्ताव मा. प्रशासक सो. यांचे पुढे ठेवणेस आपणाची मंजुरीस शिफारस असे.

पुढिल आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधीत विभागाने विहित पध्दतीने करावी.

मा. आयुक्त सो यांचे मान्यतेने

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त
अग्निशमन व आणीबाणी सेवा
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## अग्निशमन विभाग

### प्रशासकीय ठराव दि. ०२ / ०८ /२०२३ रोजी ११.३० वाजता

**प्रकरण क्रमांक** (९८९) अग्निशमन विभागाकरिता नासा फायर एक्स्टींग्युशर्स अग्निशामके यंत्रणा खरेदी करणेबाबत.

**कार्यालयीन प्रस्ताव**

**संदर्भ :-** १) मिभा/मनपा/अग्नि/१७३/२०२३-२४ दि. ०८/०५/२०२३ रोजीचा अहवाल.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळवितो की, संदर्भ क्र.१ अन्वये **Nasa Water Based 45 ltr Fire Extinguisher For High Tempreature Class A Fire (T-450-W-ACH)** नासा फायर एक्स्टींग्युशर्स अग्निशामके यंत्रणा खरेदी करणेबाबत मिभा/मनपा/अग्नि/१७३/२०२३-२४ दि.०८/०५/२०२३ रोजीच्या अहवालास मा. आयुक्त सो. यांची मंजूरी प्राप्त केल्याच्या अनुषंगाने आपणास कळवू इच्छितो की, वेलॉसिटी वेंचर या कंपनींचे **Nasa Water Based 45 ltr Fire Extinguisher For High Tempreature Class A Fire (T-450-W-ACH)** फायर एक्स्टिंग्युशर हे सर्व प्रकारच्या (अ, ब, क) आगी विझविण्यासाठी उपयुक्त असुन हा एक्स्टींग्युशर्स उपयुक्तते नुसार कमी जास्त प्रमाणात वापरला जावु शकतो. तसेच सदरची अग्निशमन यंत्रणा ही **BIS** स्वीकृत असुन त्यास कंपनीने १० वर्षाकरीता मोफत मेन्टेंन्स हमी (वॉरंटी) दिली आहे.तसेच नासा एक्स्टिंग्युशर हे सर्व प्रकारच्या आगींवर मुख्यतः पेट्रोलियम आगीवर वापरता येईल. तसेच सदर उपकरणाची वॉरंटी कालावधी व आगीवर गरजेनुसार वापर करण्याची मुभा असल्याने एकापेक्षा अधिक वेळा वापर करता येईल. त्यामुळे अनाठायी रिफीलिंग चा खर्च टाळता येईल.

मे. वेलॉसिटी वेचर यांनी **Nasa Water Based 45 ltr Fire Extinguisher For High Tempreature Class A Fire (T-450-W-ACH)** (ट्रॉली माउंटेड) ४५ लिटर क्षमतेचे अशा फायर एक्स्टिंग्युशर्स करिता १८% जी. एस. टी. सह सादर केलेल्या बाजारातील किमतीचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | तपशील | दर प्रति नग (रु.) | जी. एस. टी. १८% (रु.) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ४५ लिटर क्षमतेचे | ८,३५,२५० | १,००,२३० | ९,३५,४८० |

सदर उपकरणांची बाजारात अंदाजे किंमत वर नमुद केल्याप्रमाणे आहे. अग्निशमन विभागाकरिता सदरची ४५ लिटर क्षमतेचे १० नग खरेदी करिता प्रति नग रु. ९,३५,४८०/- या दराने असे अंदाजित खर्च रु.९३,५४,८००/- इतका अपेक्षित आहे.

सन २०२३-२४ या चालु आर्थिक वर्षात "साधन सामुग्री व भांडारे याची खरेदी" या लेखाशिर्षाअंतर्गत रू. ५५०.००/- लाख इतकी तरतूद आहे.

तरी अग्निशमन विभागाकरीता **Nasa Water Based 45 ltr Fire Extinguisher For High Tempreature Class A Fire (T-450-W-ACH)** (ट्रॉली माउंटेड) ४५ लिटर क्षमतेचे १० नग खरेदी करणेकरीता येणाऱ्या अंदाजे खर्चास रुपये रु. ९३,५४,८००/- या खर्चास मा.प्रशासक सो. यांची मंजुरी मिळणेस कार्यालयीन प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

### सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र. ९८९ दि.०२/०८/२०२३.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरिता नासा फायर एक्स्टींग्युशर्स अग्निशामके यंत्रणा खरेदी करणेबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४ दि. २६/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी. दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन अग्निशमन विभाग प्रस्तावीत करित असलेल्या एकुण १० नग **Nasa Water Based 45 ltr Fire Extinguisher For High Tempreature Class A Fire (T-450-W-ACH)** (ट्रॉली माउंटेड) नासा फायर एक्स्टींग्युशर्स अग्निशामके (४५ लिटर क्षमतेचे) १० नग खरेदी करणेच्या कामाकरिता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकीय तरतुदींपैकी लेखाशिर्ष "साधन सामुग्री व भांडारे यांची खरेदी" या लेखाशिर्षाअंतर्गत रू. ५५०.००/- लाख इतकी तरतूद आहे.

या लेखाशिर्षात अंतर्गत अंदाजे खर्च रु.९३,५४,८००/- (अक्षरी रुपये त्र्याण्णव लाख चोपन्न हजार आठशे मात्र) या रकमेस व सदर कामी ई निविदा www.mahatender.gov.in या शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेस व येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

पुढिल आवश्यक कार्यवाही मियमानुसार संबंधीत विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका